यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : १४ /११ /२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६, एम. ए पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (राज्यशास्त्र M88)


शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (DEB) मार्गदर्शक सूचनेनुसार पदव्युत्तर पदवी एम. ए.राज्यशास्त्र (M88) या शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग दि. १३/११/२०२५रोजी दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमध्ये ऑनलाईन माध्यमातून आयोजित केला होता. यावेळी डॉ. सुनील भारोडकर शैक्षणिक संयोजक राज्यशास्त्र, यांनी प्रास्ताविक व उद्बोधन वर्ग आयोजित करण्याची भूमिका विशद केली. या उद्बोधन वर्गासाठी मार्गदर्शक म्हणून विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणप्रणाली, विद्यापीठाची पार्श्वभूमी, विद्यापीठचा परिचय, उदिष्टे, विद्यापीठ कार्यपद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या उद्बोधन सत्रात डॉ. भारोडकर, यांनी PPT च्या माध्यमातून एम. ए. राज्यशास्त्र (M88) या शिक्षणक्रमाची ओळख करून दिली. त्यामध्ये त्यांनी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचा परिचय, उद्दिष्टे, शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पती, शिक्षणक्रम संरचना, अभ्यासक्रम संरचना, श्रेयांक पद्धती, मूल्यमापन संरचना, मुल्यांकन पद्धत , स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, गृहपाठ पद्धती, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना, महत्वाची संकेतस्थळे व नोकरीच्या भविष्यातील संधी या विषयी सविस्तर सादरीकरण केले.

शेवटी प्रश्नोउत्तराचे सत्र आयोजित करून विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रमाविषयी तसेच अभ्यासक्रमाबाबत विविध प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांचे विस्तृत निरासरण करण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र व आंतरविद्याशाखीय क्षेत्राबाबत तसेच भविष्यकालीन करिअरविषयक मार्गदर्शन मिळण्यासाठी अतिरिक्त सत्र / वर्ग घेण्याची मागणी केली. त्या बाबत विद्यार्थ्यांना आश्वस्त करण्यात आले.


या उद्बोधन सत्रात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून मा. संचालक यांच्या संमतीने उद्बोधन वर्गाचा समारोप करण्यात आला. हा उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी तांत्रिक सह्याय्य धम्मरत्न जावळे शैक्षणिक संयोजक, व श्री. गुलाब घाटाळ, प्रशासकीय सहाय्यक यांनी मोलाचे सहकार्य केले.


**सोबत** : ऑनलाईन झूम लिंक,युट्युबलिंक व फोटो -
https://us06web.zoom.us/j/87006779491?pwd=kXeb03sYmWUs3yvnX4m6Gb8HwsbAKt.1
Ytube Link : https://www.youtube.com/live/n0U-Ia2TwNE?si=KA55xNXsoi1fJv0q




**Induction Program | MA-Political Science July 2025 | YCMOU | SHSS**

YCMOU, Humanities & Social Sciences Subscribe 6 Share Download




**Induction Program | MA-Political Science July 2025 | YCMOU | SHSS**

YCMOU, Humanities & Social Sciences Subscribe 6 Share Download

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मु.वि., नाशिक

14/11/2025

संचालक

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा